14 JAN 2018
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## देवानंद शिंदे : इचलकरंजीत टेक्सपोजर २०१८ प्रदर्शनाची धामधूम

# प्रदर्शनातून उद्योगाच्या प्रगतीची प्रेरणा


लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी** : वस्त्रोद्योगाच्या प्रदर्शनामध्ये संशोधन, तंत्रज्ञान, कौशल्य व व्यवस्थापन यांचा सुंदर मिलाप असतो. त्यामुळेच अशा प्रदर्शनांचे महत्त्व उद्योजक व व्यावसायिकांना अधिक असते. त्यातूनच उद्योग व्यवसायाची प्रगती साधण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील टेक्सपोजर २०१८ या वस्त्रोद्योगाच्या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी शनिवारी कुलगुरु शिंदे आले असताना ते बोलत होते. शिंदे म्हणाले, युरोपियन देशामध्ये ज्या प्रकारचे प्रदर्शन भरविले जाते तसे प्रदर्शन रोटरी व डीकेटीई यांनी भरविले ते प्रत्यक्ष पाहिल्यानंतर समजले.

यावेळी खासदार राजू शेट्टी म्हणाले, नोटाबंदी व जीएसटीमुळे वस्त्रोद्योगात कमालीची अस्थिरता आली आहे; मात्र त्यावर योग्य नियोजन व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मात करता येते. टेक्सपोजर सारख्या प्रदर्शनातून तंत्रज्ञानातून विकास साधण्याचे कौशल्य उद्योजकांना मिळत आहे.

माजी मंत्री प्रकाश आवाडे, 'डीकेटीई'चे प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. प्रदीप गांधी यांनी स्वागत केले, तर अंबरीश सारडा यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी, शिरोळ तालुका सूत गिरणीचे अध्यक्ष अशोक माने, महेश काकडे, आदींसह रोटरीचे सदस्य व डीकेटीईचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



इचलकरंजीतील वस्त्रोद्योग प्रदर्शनातील आधुनिक लूमची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व खासदार राजू शेट्टी यांना प्रकाश आवाडे यांनी दिली. यावेळी नितीन धुत, अंबरीश सारडा, महेश काकडे, आदी उपस्थित होते.

बसवेश्वर गार्डनच्या क्रीडांगणावर वस्त्रोद्योगातील प्रदर्शन गेले तीन दिवस सुरु आहे. प्रदर्शनात असलेल्या स्टॉल्सपैकी ५० हून अधिक स्टॉल विणकाम क्षेत्रातील, ५५ स्टॉल्स विणकाम क्षेत्रातील यंत्रसामग्रीच्या सुट्या भागांचे, २० स्टॉल प्रोसेसिंग व डाईंगचे, १० स्टॉल गारमेंट-निटींगचे, १५ स्टॉल्स सूत कताई क्षेत्रासाठीचे, २० स्टॉल एअर कॉम्प्रेसरचे, तर १०-स्टॉल्स विविध प्रकारच्या सल्लागारांचे आहेत. याशिवाय वातानुकूलित यंत्रणा, इलेक्ट्रॉनिक्स कंट्रोल सिस्टिमचेही स्टॉल्स आहेत.दोन दिवसांत १५ हजारांहून अधिक उद्योजक, तंत्रज्ञान व व्यावसायिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली आहे.

# टेक्सपोजरमध्ये आधुनिकीकरणाची पर्वणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी** : साधा यंत्रमाग सुलभ पद्धतीने आधुनिक करण्याच्या तंत्रज्ञानापासून ते एका मिनिटाला १०५० फेरे घेत दर्जेदार कापड विणणारा शटललेस हे सर्व एकाच छताखाली पाहण्याची पर्वणी येथील उद्योजक, तंत्रज्ञ, कामगार वर्गालाही प्राप्त झाली आहे. टेक्सपोजर २०१८ या प्रदर्शनात वस्त्रोद्योगातील सायझिंग, विणकाम, कापडावर प्रक्रिया, रंगणी अशा विविध घटकांची माहिती मिळत असल्याने येथे गर्दी होत आहे.

रॅपिअर लूमसाठी लागणारे सुटे भाग, वगंण याबरोबरच उद्योगासाठी लागणाऱ्या स्टील बांधकामाचे तंत्रज्ञानसुद्धा येथे मांडण्यात आले आहे. आधुनिक यंत्रे सुरु असताना उत्पादनात बदल करावयाचा असल्यास अगदी थोडक्या प्रक्रियेद्वारे कसे बदल करता येतात, ज्यामुळे वेळ व श्रम यांची बचत होते, याचेही मार्गदर्शन मिळत आहे. साध्या यंत्रमागाचे रॅपिअर लूममध्ये रूपांतराबरोबरच त्यावर उत्पादनाची क्षमता किती आहे याचीही माहिती येथील स्टॉलमध्ये मिळत आहे.

> धावपळीच्या काळात वेळ काढून अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेण्यासाठी कोठेही बाहेर न जाता आपल्याच शहरात चांगली माहिती मिळणे या प्रदर्शनामुळे शक्य झाले आहे. त्यामुळे ही एक पर्वणीच ठरली आहे.
>
> **- मधुकर महादेव पांढरे, अध्यक्ष, पिडीएक्सेल**

> उत्तम नियोजन, चांगला प्रतिसाद, विदेशातील लोकांनी आपल्या शहरात येऊन स्टॉल लावून आधुनिकतेबद्दल येथील उद्योजकांना माहिती दिली..आपला व्यवसाय अपडेट करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.
>
> **- मनोहर जठार, उद्योजक.**

> ज्या उद्योजकांना परदेशात जाणे शक्य होत नाही अशासाठी टेक्सपोजर २०१८मधून एक नामीसंधी मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन प्रत्यक्षात अनुभवता यावे यासाठी असे प्रदर्शन प्रत्येक दोन वर्षांनी भरविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. **- डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर,** चेअरमन, ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को-ऑप. स्पिनिंग मिल्स.

> देश, परदेशांतील वस्त्रोद्योगातील प्रदर्शने मी प्रत्यक्ष पाहिली आहेत. इचलकरंजीचे प्रदर्शन पाहिले असता परदेशात आल्याचा अनुभव आला. वस्त्रोद्योगातील अत्याधुनिक तंत्रज्ञान उद्योजकांनी आत्मसात करून आपल्या उद्योगाची प्रगती साधावी. **- नजीरअहमद कोगनोळी,** उपाध्यक्ष-कर्नाटक राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ.

14 JAN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# तुमच्या काळजीमुळेच आम्ही सुरक्षित

## कुलगुरू डॉ. शिंदे : सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्यापीठातील वाहनचालक, रक्षकांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : 'तुमचे दक्ष हात व नजर, माझी काळजी वाहत असल्यानेच' माझे कुटुंब रात्री निश्चिंतपणे झोपू शकते. आपण घेत असलेल्या काळजीविषयी मी कृतज्ञ आहे,' अशी हृद्य भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. निमित्त होते, रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्यापीठाच्या वाहनचालकांच्या सत्काराचे! रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त कुलगुरू कार्यालयात विशेष कार्यक्रम झाला. विद्यापीठाचे सर्व वाहनचालक या वेळी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, की वक्तशीरपणा, निर्व्यसनीपणा आणि विश्वासार्हता हे विद्यापीठाच्या सर्वच वाहनचालकांचे सद्‌गुण आहेत. आपले काम, आपले विद्यापीठ आणि आपले अधिकारी यांच्याविषयीचे त्यांच्या मनातील प्रेम त्यांच्या वर्तनातून दिसत असते. आमचे जीवन त्यांच्या हातात असल्याची जाणीव त्यांना सदोदीत असते. त्यामुळे वाहनाची स्वच्छता, वेळच्या वेळी मेंटेनन्स याबाबत ते सदैव सतर्क असतात. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी वाहनचालकांच्या उत्तम वर्तनाबद्दल प्रशंसोद्‌गार काढले. कुलगुरूंच्या हस्ते शाल व ग्रंथभेट देऊन वाहनचालकांचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते वाहनचालकांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. (उजवीकडून) आनंदा लोखंडे, बबन पाटील, मधुकर कुंडल्ये, सदानंद लोखंडे, शिवाजी शिंदे, प्रल्हाद गंगाधरे, अजित पाटील, सुरक्षारक्षक किरण पवार.**

यात आनंदा लोखंडे, बबन पाटील, मधुकर कुंडल्ये, सदानंद लोखंडे, प्रल्हाद गंगाधरे, शिवाजी शिंदे, अजित पाटील आणि सुरक्षारक्षक किरण पवार यांचा समावेश होता.

या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, एनएसएस समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे, वाहन विभागाचे सहायक कुलसचिव डॉ. यू. के. सकट आदी उपस्थित होते.

